


शिवसेनेचे धोरण कायम कामगार वर्गाच्या हिताचे राहील - इरफान सय्यद

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 05/08/2025 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 172 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# आ.अमित गोरखे यांना यंदाचा लहुजी वस्ताद साळवे पुरस्कार प्रदान




>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

क्रांतिवीर लहुजी वस्ताद प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित हिंदू मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ उत्साही वातावरणात बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे संपन्न झाला. मागासवर्गीय समाजातील १० वी व १२वी उत्तीर्ण होत असताना उच्च गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच सामाजिक क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींचा यावेळी सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला आमदार मा.अमित गोरखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते १०वी व १२वीमध्ये उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे व गौरवपत्र देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

प्रतिवर्षी मागासवर्गीय समाजातील उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना दिला जाणारा “क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे पुरस्कार” यंदा पिंपरी-चिंचवडचे युवा आमदार मा. अमितजी गोरखे यांना प्रदान करण्यात आला. "या पुरस्काराची स्थापना मागासवर्गीय समाजात सामाजिक परिवर्तन आणि शैक्षणिक जागृतीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ तसेच लहुजी वस्ताद साळवे यांनी त्यांच्या जीवनात वापरलेल्या चांदीच्या कड्याच्या प्रतीकात्मक रूपात प्रत्यक्ष चांदीचा कडा देण्यात आला. हा कडा केवळ एक स्मृतिचिन्ह नसून लहुजी वस्ताद यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनाचा साक्षात्कार घडवणारे प्रतीक आहे."

या वर्षीचा पुरस्कार ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. सुधाकर जाधवर, मिलिंद एकबोटे यांच्या शुभहस्ते आ.अमित गोरखे यांना प्रदान करण्यात आला. त्यांचे सामाजिक न्याय, शैक्षणिक प्रोत्साहन, मागासवर्गीय समाजासाठी विधीमंडळात केलेले भरीव कार्य आणि तरुण नेतृत्वातून घडवलेले सामाजिक भान याची प्रचिती म्हणून त्यांची निवड करण्यात आली.

यावेळी आमदार अमित गोरखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, "तुम्ही केवळ गुणांनी यशस्वी होता तेवढंच नाही, तर तुमच्यामुळे समाजालाही उभारी मिळते. आजचा हा सन्मान तुम्हाला पुढील शिक्षणासाठी प्रेरणा देणारा ठरेल. शिक्षण हीच खरी क्रांती आहे."

कार्यक्रमात डॉ. सुधाकर जाधवर, समीर कुलकर्णी, मिलिंद एकबोटे, योगेश ठिपसे, किसनराव जाधव, यशस्वी उद्योजक योगेश देशपांडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'खान्देश भवन' उभारण्याची मागणी



>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

तीन दिवसांच्या उत्साहानंतर आज पिंपरी-चिंचवडमध्ये आयोजित 'खान्देश सार्वजनिक श्री कानबाई माता उत्सव २०२५' चा समारोप झाला. हजारो खान्देशी बांधवांनी 'पुढच्या वर्षी लवकर या' च्या जयघोषात आपल्या लाडक्या कानबाई मातेला भावपूर्ण निरोप दिला. या उत्सवाच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवडमध्ये 'खान्देश भवन' उभारण्याची मागणी राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्याकडे करण्यात आली. या सोहळ्याला जलसंपदामंत्री गिरीश महाजन, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार श्रीरंग बारणे, आमदार मंगेश चव्हाण, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, आमदार राजू मामा भोळे, माजी आमदार कुणाल पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उत्सवाच्या आयोजकांनी पाहुण्यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. रात्री, श्री कानबाई फ्रेंड्स सर्कल ग्रुपने सादर केलेल्या भक्तिगीतांनी वातावरण भक्तिमय केले.कानबाई उत्सवाचा उत्साह आणि 'खान्देश भवन'ची मागणीपिंपरी-चिंचवडमध्ये स्थायिक झालेल्या खान्देशी बांधवांसाठी हा उत्सव संस्कृती आणि परंपरेच्या जतनाचे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरला. उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी, रविवारी आयोजित मुख्य कार्यक्रमात प्रमुख संयोजक नामदेव ढाके यांनी जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांना 'खान्देश भवन' उभारण्याची मागणी केली. "पिंपरी-चिंचवडमध्ये खान्देशातून आलेले लाखो बांधव रोजगारासाठी आणि व्यवसायानिमित्त स्थायिक झाले आहेत. आपल्या मूळ गावापासून दूर असले तरी, आपली संस्कृती आणि परंपरा जपण्याची त्यांची इच्छा आहे. 'खान्देश भवन' हे अशा लोकांसाठी एक सांस्कृतिक केंद्र बनेल. या ठिकाणी खान्देशातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, नोकरी-व्यवसायासाठी मार्गदर्शन केंद्र, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सभागृह अशा अनेक सुविधा उपलब्ध होऊ शकतील. हे भवन खान्देशी समाज बांधवांसाठी एक हक्काचे व्यासपीठ ठरेल.", असे ढाके यांनी सांगितले. आमदार मंगेश चव्हाण, आमदार शंकर जगताप, आमदार राजू मामा भोळे यांच्यासह अनेक मान्यवर आणि खान्देशी समाज बांधवांनी या मागणीला पाठिंबा दिला.

या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देत मंत्री गिरीश महाजन म्हणाले, "पिंपरी-चिंचवडमध्ये खान्देशी बांधवांनी आपली संस्कृती जपली आहे.

'खान्देश भवन'ची मागणी योग्य असून, यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल." त्यांच्या या आश्वासनामुळे उपस्थितांमध्ये आनंदाची लाट पसरली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 05/08/2025

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# अतिश बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष अतिश आनंदाराव बारणे यांचा २ ऑगस्ट रोजी अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता,परंतु त्यांच्या जवळचे सहकारी स्व.रोहित शिवाजी सुतार यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्याने हा सोहळा रद्द करण्यात आला.**





आपल्या जवळचा सहकारी मित्र दगावल्याने त्याच्या स्मरणार्थ अभिष्टचिंतन सोहळ्यादिवशी 2 ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सक्षम सोशल फाउंडेशन मोशी यांच्याकडून भव्य अशा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.रक्तदान शिबिरांमध्ये रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तू यावेळी देण्यात आल्या.मोठ्या प्रमाणावर यावेळी रक्तदान करण्यासाठी रक्तदात्यांची गर्दी पाहायला मिळाली. या भव्य रक्तदान शिबिरा वेळी भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार.मा.श्री.विलासशेठ लांडे,राष्ट्रवादी महिला शहर अध्यक्षा कविताताई आल्हाट,सिल्वराईज ग्रुपचे डायरेक्टर.संतोषशेठ बारणे,माजी नगरसेवक रवीभाऊ लांडगे, माजी नगरसेवक.वसंतशेठ बोराटे,माजी नगरसेविका.मंदा ताई अल्हाट,सामाजिक कार्यकर्ते दत्ता मोकाशी,राजू भाऊ सस्ते,रमेश शेठ गायकवाड,सौ वंदनाताई आल्हाट, राजेंद्र ओझरकर,काळुराम सस्ते,राम सासवडे,संदीप सस्ते, प्रशांत सस्ते, गणेश सस्ते,अशोक ढोकळे मामा,स्वप्नील सोनवणे, व्यंकटेश सोनवणे तसेच सर्व जेष्ठ नागरिक व सहकारी मित्र परिवार आणि सक्षम सोशल फाऊंडेशन व सर्व सोसायटीतील चेअरमन, सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व राजकीय,शैक्षणिक व सामाजिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच मित्र परिवार यांनी सदिच्छा भेट दिली आणि याच मला खऱ्या अर्थाने शुभेच्छा आणि आशीर्वाद असे भावना यावेळी उपस्थितांचे आभार व्यक्त करताना अतिश बारणे यांनी काढले.

हे भव्य रक्तदान शिबिर शनिवार दिनांक २ ऑगस्ट रोजी पकवान हॉटेल,बँक्वेट हॉल, बारणे पाटील चौक, बारणे वस्ती, मोशी या ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडले.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचार प्रबोधन पर्वात रंगला ऐतिहासिक सोहळा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रबोधन पर्वानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाज परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या अण्णाभाऊंच्या कार्याचा गौरव करत पारंपरिक लोककलांचा अनोखा कार्यक्रम सादर करण्यात आला.**



या कार्यक्रमास जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाबासाहेब रसाळ,सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब आडागळे, संदीपान झोंबाडे, नाना कसबे,संजय ससाणे,अरूण जोगदंड,सतिश भवाळ,नितीन घोलप,युवराज दाखले,भगवान भगवान शिंदे,आशाताई शहाणे,केसरताई लांडगे, चंद्रकांत लोंढे ,डी.पी.खंडाळे, आण्णा कसबे,शिवाजी साळवे,विशाल कसबे,शांताराम खुडे,यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विठ्ठल रखुमाई दिंडी भजन मंडळ, तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग यांच्या ६५ कलाकारांच्या भव्य दिंडी महोत्सवाने तसेच पारंपरिक वेशभूषा, टाळ-मृदुंगाचा गजर, भक्तीमय अभंग आणि उत्स्फूर्त जयघोष यामुळे संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला होता. भगव्या पताकांच्या लहरी आणि भजनांच्या सुरांनी वातावरण भारावून गेले होते तर विठू माऊली,जगद्रूरू तुकाराम महाराज,छत्रपती शिवाजी महाराज,त्यांचे मावळे आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या हुबेहूब सादर केलेल्या व्यक्तिरेखा श्रोत्यांनी मोबाईलमध्ये काढून घेतल्या.

त्यानंतर संध्याकाळी ७ वाजता रंगला "लोकगीतांचा भव्य कार्यक्रम". या सत्रात नृत्य कलाकार आरती पुणेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या बहारदार सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली. पारंपरिक मराठी लोकगीतांच्या माध्यमातून त्यांनी स्त्रीजीवन, श्रमसंस्कृती,आणि ग्रामीण भावभावनांचे सुंदर दर्शन घडवले. त्यांच्या लोकगीतातील सहजता आणि रसिकांशी जोडलेली नाळ यामुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची सांगता प्रसिद्ध गायक मिठू पवार यांच्या कार्यक्रमातून झाली. "मराठी साज हा कलेचा बाज" याचे जिवंत दर्शन घडवत भावगीते, चित्रपट गीते आणि सुफी छटांची गाणी प्रेक्षकांना एका वेगळ्याच भावविश्वात घेऊन गेली. त्यांचा अलौकीक स्वर, बोलक्या भावनांची मांडणी आणि दर्जेदार सादरीकरण यामुळे सभागृहातील रसिक मंत्रमुग्ध झाले होते.

या कार्यक्रमांतून अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची, समाजाभिमुखतेची आणि लोककलांशी असलेल्या नात्याची उजळणी झाली.

त्यांच्या कार्याची प्रेरणा आजही नव्या पिढीला मार्गदर्शक ठरते, हे या सांस्कृतिक सादरीकरणातून स्पष्ट झाले.

# पिंपरी तडीपार गुंडास कोयत्यासह अटक

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

तडीपार आदेशाचा भंग करून मावळ तालुक्यातील बधलवाडी येथे आलेल्या तडीपार गुंडास पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून एक कोयताही हस्तगत केला. ही कारवाई शुक्रवारी (दि. १ ऑगस्ट) दुपारी ३ वाजताच्या सुमारास करण्यात आली.

सचिन धर्माजी बधाले (वय ३५, रा. बधलवाडी, ता. मावळ) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिस अंमलदार आसिफ इलीयास सय्यद यांनी याप्रकरणी शुक्रवारी (दि. १ ऑगस्ट) तळेगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सचिन बधाले याला परिमंडळ दोनचे पोलिस उपायुक्त यांनी ९ नोव्हेंबर २०२४ रोजी दोन वर्षाकरिता संपूर्ण पुणे जिल्ह्यातून तडीपार केले होते. मात्र, तो शासनाची परवानगी न घेता बधलवाडी येथे आल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक कोयता मिळून आला.



# शिवसेनेचे धोरण कायम कामगार वर्गाच्या हिताचे राहील - इरफान सय्यद

## मातोश्री व रायरेश्वर माथाडी कामगार सहकारी पतसंस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा यशस्वीपणे संपन्न.

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड (ता. ३ ऑगस्ट): पिंपरी चिंचवड शहरात मातोश्री व रायरेश्वर माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. या सभेच्या अध्यक्षस्थान कामगार नेते इरफान भाई सय्यद यांनी भूषविले यावेळी शिवसेनेचे धोरण नेहमी कामगारांच्या हिताचे राहतील अशा भावना कामगार नेते इरफान सय्यद यांनी व्यक्त केले. आकुर्डी येथील खंडोबा सांस्कृतिक भवन येथे मातोश्री माथाडी कामगार सहकारी पतसंस्था मर्या. आणि रायरेश्वर माथाडी कामगार सहकारी पतसंस्था मर्या. या दोन्ही संस्थांची वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीपणे पार पडली.**




तसेच इरफान भाई सय्यद यांनी सांगितले की,दोन्ही पतसंस्थांनी कामगारांच्या आर्थिक आत्मनिर्भरतेचा मार्ग खुला केला आहे.सभासदसंख्या वाढ, ठेवी, स्वनिधी, गुंतवणूक आणि पारदर्शक कारभार हीच यशाची गुरुकिल्ली ठरली आहे. शिवसेनेचे धोरण कायम कामगारवर्गाच्या हिताचे राहील

रायरेश्वर पतसंस्थेचा ३२ वा अहवाल अध्यक्ष श्री. सतिश कंटाळे यांच्या अध्यक्षतेखाली सादर झाला. सदस्यसंख्या 1270 पर्यंत पोहोचलेली असून, संस्थेने खालील आर्थिक प्रगती साधली आहे:

वसूल भाग भांडवल: ₹7 कोटी 45 लाख ठेवी: ₹2 कोटी 5 लाख कर्जवाटप: ₹12 कोटी 35 लाख स्वनिधी निधी: ₹2 कोटी 37 लाख बँकेत गुंतवणूक: ₹3 कोटी 24 लाख निव्वळ नफा: ₹1 कोटी 5 लाख संचालक मंडळ (रायरेश्वर): श्री. श्रीकांत मोरे (उपाध्यक्ष), श्री. ज्ञानेश्वर घनवट (सचिव), श्री. रोहित नवले (खजिनदार), तसेच संचालक श्री. भिवाजी वाटेकर, श्री. शंकर निकम, श्री. विजय खंडागळे, श्री. सुभाष पुजारी, श्री. बाळू ओव्हाळ, श्री. संदीप चोरे, श्री. गुलाब शिंदे आदींनी उपस्थिति लावली तर

मातोश्री पतसंस्थेचा 28 वा अहवाल अध्यक्ष श्री. पांडुरंग कदम यांच्या अध्यक्षतेखाली सादर झाला.

सदस्यसंख्या 1444 पर्यंत पोहोचलेली असून, संस्थेने खालील आर्थिक प्रगती साधली आहे:

वसूल भाग भांडवल: ₹9 कोटी 70 लाख ठेवी: ₹2 कोटी 34 लाख कर्जवाटप: ₹17 कोटी 96 लाख स्वनिधी निधी: ₹3 कोटी 53 ला बँकेत गुंतवणूक: ₹2 कोटी 98 लाख निव्वळ नफा: ₹1 कोटी 32 लाख

संचालक मंडळ (मातोश्री ): श्री. पांडुरंग कदम (अध्यक्ष) श्री बबन काळे (उपाध्यक्ष), श्री. उध्दव सरोदे (सचिव), श्री. सर्जेराव कचरे (खजिनदार), तसेच संचालक श्री. गोरक्ष दुबाले, श्री बाबासाहेब पोते, श्री.अशोक साळुंके , श्री. विठ्ठल इंगळे , श्री. समर्थ नाईकवडे, श्री. ज्ञानदेव पाचपुते , श्री. चंद्रकांत पिंगट, आदींनी उपस्थिति लावली.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. इरफानभाई सय्यद होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दिलीप देशमुख (अध्यक्षः असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट, पुणे) तसेच महाराष्ट्र मजदूर संघटनेचे पदाधिकारी, सभासद कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन:

श्री. सर्जेराव कचरे व अहवाल वाचन: श्री. प्रकाश पवार व श्री. धर्मराज कदम यांनी केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 05/08/2025

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुण्यात स्थापन करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची कायदा मंत्र्यांकडे मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पुणे जिल्ह्याची लोकसंख्या दीड कोटींपर्यंत पोहोचली आहे. महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये पुण्याची गणणा होते. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुण्यात स्थापन करण्याची मागणी शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्याकडे केली आहे.**




खासदार बारणे यांनी कायदा मंत्री मेघवाल यांची दिल्लीत भेट घेतली. पुण्यात खंडपीठ स्थापन होण्याबाबतची गरज त्यांच्या निदर्शनास आणून दिली. या मागणीचे सविस्तर निवेदन त्यांना दिले. खासदार बारणे यांनी निवेदनात म्हटले आहे की, पुणे, पिंपरी-चिंचवडसह लगतच्या अहिल्यानगर, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे न्यायलयीन प्रकरणांमध्येही वाढ होत आहे. पुणे महानगर क्षेत्राची लोकसंख्या आजमितीला दीड कोटीपर्यंत जाऊन पोहोचली आहे. औद्योगिक, आयटी हब, सांस्कृतीक, शिक्षणाचे माहेरघर असलेले पुणे मोठ्या झपाट्याने विस्तारत आहे. मुंबई उच्च न्यायालयातील खटल्यापैंकी ४५ टक्के खटले पुणे जिल्ह्यातील आहेत.

पुण्यात खंडपीठ नसल्याने पक्षकारांना खटल्याच्या सुनावणीसाठी सातत्याने मुंबईला जावे लागते. प्रवासात चार तासांचा वेळ जाण्याबरोबरच आर्थिक खर्च आणि मानसिकत्रासही सहन करावा लागत आहे. अहिल्यानगर, सातारा, सोलापूर जिल्हे भौगोलिकदृष्ट्या पुणे जिल्ह्यालगत आहेत. या जिल्ह्यातील नागरिकांनाही या समस्यांना सामोरे जावे लागते. सद्यस्थितीत नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कार्यरत आहे.

त्यामुळे या भागातील लोकांना न्यायाचा लाभ मिळत आहे. कोल्हापूरमध्येही मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्यात येत आहे. नागरिकांना वेळेवर, जलदगतीने न्याय मिळणे आवश्यक आहे. न्यायाला होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांचा न्याय पालिकेवरील विश्वास कमी होताना दिसून येत आहे. न्याय पालिकेवरील विश्वास मजबूत करण्यासाठी जलदगतीने न्याय मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे पुण्यात मुंब

# अकरावीसाठी आता ओपन टू ऑल फेरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत इयत्ता अकरावी प्रवेशासाठी चार नियमित प्रवेश फेऱ्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यानंतर आता सर्वांसाठी खुली प्रवेश फेरी (ओपन टू ऑल) घेण्यात येणार आहे. या फेरीचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले आहे. या फेरीची ४ ते ६ ऑगस्ट या कालावधीत प्रक्रिया राबविण्यात येणार असून, ६ ऑगस्टला गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे.**



राज्यात एकूण चौथ्या फेरीअखेर ९ हजार ५२२ कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी झाली असून, यात एकूण प्रवेश क्षमता २१ लाख ५० हजार ४७९ दर्शविण्यात आली. चौथ्या फेरीअखेरपर्यंत १४ लाख ३८ हजार ४८९ विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर नोंदणी केली. एकूण चार फेऱ्या पूर्ण झाल्या असून, एकूण ८ लाख ८२ हजार ८१ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले. अद्यापही प्रवेशासाठी १२ लाख ६८ हजार ३९८ रिक्त जागा आहेत.

ओपन टू ऑल या फेरीमध्ये अर्ज करण्यास ४ ऑगस्टला सकाळी ८ वाजल्यापासून ते ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० पर्यंत मुदत आहे. आतापर्यंत झालेल्या चार फेऱ्यांमध्ये प्रवेश न मिळालेले विद्यार्थी या प्रवेश फेरीमध्ये त्यांच्या अर्जाचा भाग एक व भाग दोन यामध्ये आवश्यकतेनुसार बदल व दुरुस्ती करू शकणार आहेत. नव्याने नोंदणीची सुविधाही उपलब्ध असणार आहे.

जुलै २०२५ च्या इयत्ता दहावीच्या पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेश फेरीमध्ये त्यांची नोंदणी करून प्राधान्यक्रम नोंदवू शकणार आहेत.

ओपन टू ऑल या फेरीची गुणवत्ता यादी व विद्यार्थ्यांच्या प्राधान्यक्रमानुसार कॉलेज अलॉटमेंटची यादी ६ऑगस्टला सकाळी दहा वाजता प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 96574 09579